वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–सोमवार दि. २० जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडचे आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांनी नगर पालिकेत घेतली आढावा बैठक


## बैठकीला सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती, मुख्याधिकारी निता अंधारेंनी काढले अनेक प्रश्न निकाली

### स्वच्छता, पाणी पुरवठा, विद्युत सह इतर महत्वाच्या विषयावर बैठकीत झाली चर्चा

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता





बीड, (दिव्य न्युज):– शहरातील मुलभूत नागरी प्रश्नांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२०) रोजी नगर पालिकेची आढावा बैठक घेतली. स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज आदि मुद्यावरून आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना सुनावले. प्रत्येकवेळी कोणतेही काम सांगितले तर निधी नाही असे कारण सांगणार्या अधिकार्यांनी नगर पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काय प्रयत्न केले ? असा सवालही आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला. पाणी पुरवठ्यात हयगय खपवून घेणार नाही. स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य द्या आणि उत्पन्न वाढीच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करा असे निर्देश यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिले.

बीड नगर पालिकेतील मुख्याधिकार्यांच्या दालनात झालेल्या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, मुख्याधिकारी निता अंधारे

▶▶ पान २ वर

बीड शहरातील जुन्या भाजी मंडईत नगर पालिकेने मच्छीमार्केटसाठी इमारत बांधलेली आहे. रेडिरेकनर प्रमाणे त्याचे भाडे निश्चित करण्यात आले आहे. भाडे जास्त असल्यामुळे त्या ठिकाणी कोणताच व्यवसायीक पुढे येत नाही त्यामुळे नाममात्र दरात तेथील गाळे व्यवसायीकांना दिल्यास नगर पालिकेचे उत्पन्न वाढू शकते अशी सुचना यावेळी अधिकार्यांना करण्यात आली.
त्याचबरोबर जुन्या भाजी मंडईत बीओटी तत्वावरील आणखी कॉम्पलेक्स बांधता येतील का ? या दृष्टीनेही नगर पालिकेने प्रयत्न करावेत. जेणेकरून पालिकेच्या उत्पन्नात भरत पडेल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली.

# धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आवरावे

## अन्यथा मी परळीत येऊन बसेन अन् लोकशाही मार्गाने धडा शिकवेन, तृप्ती देसाईंचा इशारा



पुणे , (दिव्य न्युज):– राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर विखारी टीका टिप्पणी करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांना रोखले नाही तर मी स्वतः परळीत येऊन बसेन आणि लोकशाही मार्गाने त्यांना धडा शिकवेन, असा निर्वाणीचा इशारा भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी मुंडे यांना दिला आहे.

तृप्ती देसाई यांनी काही दिवसांपूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे व त्यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तसेच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली होती. तेव्हापासून त्यांना सोशल मीडियावर ट्रोल करण्यात येत आहे. यामुळे

▶▶ पान २ वर

## आरोग्य विभागाचा अजब कारभार

# पाणी तपासणीसाठी दारूच्या रिकाम्या बाटल्या

बीड ,(दिव्य न्युज):– बीड जिल्हा रुग्णालय आवारातील मुख्य अणु जीवशास्त्र जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी चक्क दारुच्या रिकाम्या बाटल्यांत पाण्याचे नमुने घेण्याचा गंभीर प्रकार आढळून आला असुन काचेच्या बाटल्याची गरज असेल तर किमान प्रयोगशाळा प्रशासनाने त्या बाटल्याच्या झाकणावरील टँगो, बॉबी, संत्रा असे दारूचे लेबल तरी काढून वापरण्याची गरज आहे.त्यामुळे दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्य रित्या निर्जंतुकीकरण करून वापरात घेतात की नाही? असा प्रश्न पडला असुन एकंदरीतच पाणी तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले

▶▶ पान २ वर

# शासनाची फसवणूक करणाऱ्या विरोधात कारवाई करा

## बनावट कागदपत्रा आधारे केलेली विरासत ना मंजूर करण्याची विभागीय आयुक्तांना तक्रार

**बीड , (दिव्य न्युज):– वक्फ बोर्डाच्या जमीनीवर भुमाफिया नजर असुन यासाठी वेगवेगळ्या मार्गाचे अवलंब भुमाफिया कडून होत असल्याचे वेळोवेळी उघड झाले आहे मात्र वक्फ संस्थे कडून तात्काळ कारवाई होत नसल्याने भुमाफियाचे मनोबल मोठ्या प्रमाणावर वाढले असुन असेच काही प्रकार बीड जिल्ह्यातील कुमशी येथील दर्गा ख्वाजा बंदे नवाज या बाबतीत घडत असुन या दर्गाशी काहीही संबंध नसलेल्या व्यक्तींनी बनावट कागदपत्रे सादर करून विरासत मंजुरीसाठी अर्ज केला असून या विरोधात बीड येथील ईलियास बेग अलताज बेग यांनी विभागीय आयुक्त महसुल छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी वक्फ मंडळ छत्रपती संभाजीनगर व संबंधित विभागाकडे केली आहे.**

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,दर्गा ख्वाजा बंदेनवाज मौजे कुमशी ता बीड ची नोंद गॅझेट मध्ये आहे या दर्गाला गट नं. १६० आहे याला ८ एकर २० गुंठे जमिन शेतीसाठी व देखरेख करीता निजाम कालीन शासनानी वक्फ करून दिलेली आहे ही जमीन वक्फ मंडळाचे ताब्यात घेण्यात आलेली आहे. पुर्वी ही जमीन दीर्घ मुदतीचे करारवर भाडेवर ही दिली होती . या जमिनीचे अर्चक मयत इब्राहीम लालखान मुतवली होते . परंतू काही गैर अर्जदार ज्याचा या वक्फ संस्था व मिळकती पासून कोणतेच संबंध नसताना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद तर्फे मयत झालेली बाईला मुतवली

▶▶ पान २ वर

# एसटी निविदेत घोटाळा उघड

## पुन्हा प्रक्रियेची समितीकडून शिफारस; मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाकडे लक्ष

मुंबई , (दिव्य न्युज):– राज्य परिवहन महामंडळात (एसटी) भाडेतत्त्वावरील १३१० गाड्या घेण्याच्या निविदा प्रक्रियेत मोठ्याप्रमाणात अनियमितता झाली असून ही संपूर्ण प्रक्रियाच रद्द करावी आणि नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची महत्त्वपूर्ण शिफारस चौकशी समितीने मुख्यमंत्र्यांना केली आहे. त्यानुसार समितीच्या अहवालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणता निर्णय घेतात आणि दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते याकडे महामंडळाचे लक्ष आहे.

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तत्कालीन मुख्यमंत्री आणि परिवहनमंत्री एकनाथ शिंदे यांना अंधारात ठेवून १३१० एसटी गाड्या भाडेतत्त्वावर घेताना काही विशिष्ट ठेकेदारांवर मेहरबानी दाखविताना निविदा प्रक्रियेत परस्पर बदल केल्याची आणि त्यामुळे महामंडळास येत्या काळात सुमारे दोन हजार कोटींचा आर्थिक फटका बसण्याची गंभीर बाब ‘लोकसत्ता’ने ‘२ हजार कोटींचा एसटी घोटाळा’ (१ जानेवारी) उघडकीस आणला होता.

निविदेतील अटींमध्ये बदल करताना सर्व २० विभागांना गाड्यांची गरज असून प्रत्येक विभागात किमान तीन निविदाकार लागणार असल्याने प्रक्रियेला विलंब होईल. तसेच सर्व विभागांसाठी एकच निविदा

▶▶ पान २ वर

# मुख्य ध्वजारोहण


## बीडचे ना.दत्तात्रय भरणे तर जालन्याचे पंकजाताईंच्या हस्ते




मुंबई, (दिव्य न्युज):– भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्थ शासकीय समारंभ आयोजित

▶▶ पान २ वर

# मौलाना सय्यद नजीब साहाब यांच्या दु:खात मुंडे परिवार सहभागी


मंत्री
पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक :

कॅम्प परली वैजनाथ / पीजीएम 1008
तारीख 20.01.2025

**शोक संदेश**

बीड जिले के तबलीगी जमात के अमीर सैयद नजीब मौलाना के निधन की खबर सुनकर गहरा दुःख हुआ। सैयद नजीब मौलाना सिर्फ बीड जिले में ही नहीं बल्कि देश और विदेश में भी जाने जाते थे। उन्होंने अपने काम और प्यार से सबके दिलों में जगह बनाई थी।

मौलाना सैयद नजीब और मुंडे परिवार के बीच घनिष्ठ संबंध रहे हैं। मेरे पिता गोपीनाथजी मुंडे साहब उनसे अक्सर बीड की मरकज मस्जिद में मिलते थे और उनकी दुवा लेते थे ।

इस दुःख की घड़ी में हम पूरे जिले के मुसलमान भाईयो और चाहने वालों के साथ सैयद परिवार के दुःख में सहभागी है।

अल्लाह उन्हें जन्नतुल फिरदौस में जगह अता करे। आमीन।

(पंकजा गोपीनाथ मुंडे)



बीड, (दिव्य न्युज):– बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर मौलाना सय्यद नजीब साहाब यांचे काल ९.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.ना.पंकजाताई मुंडे यांनी मौलाना सय्यद नजीब यांच्या दुःखात शोककळा व्यक्त करत स्व.गोपीनाथ मुंडे त्यांना भेटण्यासाठी मरकज मस्जिद येथे नेहमी जायचे आणि दुवा घेत होत असे त्यांनी म्हंटले तर मौलाना नजीब यांची ओळख भारतातच नव्हे तर विदेशात ही होती. या दुःखात जिल्ह्यातील सर्व मुस्लिमांनसोबत असल्याचेही त्यांनी म्हंटले.

# उपमुख्यमंत्री दुसऱ्यांदा, तर बीडमध्ये दोन कॅबिनेट तरीही बाहेरचे पालकमंत्री



बीड, (दिव्य न्युज):– जिल्ह्यात पहिल्यांदाच दोन कॅबिनेट मंत्री असतानाही बाहेरच्या मंत्र्यांकडे पालकत्व देण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर उपमुख्यमंत्री म्हणून पालकमंत्री होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी १९९५ ते १९९९ साली गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री होते. दरम्यान, बीडमधील पंकजा मुंडे यांना शेजारच्या जालना जिल्ह्याचे पालकमंत्री करण्यात आले आहे तर धनंजय मुंडे यांना डावलण्यात आले आहे.

राज्यात महायुतीचे सरकार आले. बीडला धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या रूपाने दोन कॅबिनेट मंत्री मिळाले. आता यांच्यापैकी कोण पालकमंत्री होणार? अशी चर्चा सुरू असतानाच ९ डिसेंबर रोजी मस्साजोगच्या सरपंचाची हत्या झाली. तसेच आवादा कंपनीच्या अधिकाऱ्याला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराइसह तिघांवर गुन्हा दाखल झाला. हे प्रकरण राज्यभर गाजले. अधिवेशनातही यावरून गदारोळ झाला. महायुती व महाविकास आघाडीच्या आमदारांनीच मंत्री धनंजय मुंडे यांना निशाणा करत राजीनाम्याची मागणी केली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी बीडचे पालकमंत्री व्हावे, अशी मागणी केली. हा सर्व रोष पाहून महायुतीकडून मुंडे बहीण– भावाला बाजूला करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पालकमंत्री केले. आता त्यांच्याकडून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आणि जातीय सलोखा टिकवण्याची अपेक्षा आहे.

### कोणत्याच जिल्ह्याचे पालकमंत्री नको – मुंडे

सध्या बदललेली राजकीय व सामाजिक स्थिती पाहता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना मी स्वतः बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद अजितदादांनी स्वीकारण्याबाबत विनंती केली होती. सद्यस्थितीत मला कोणत्याच जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी नको, अशी विनंतीही मान्य केली, असे धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावरून स्पष्ट केले आहे.

### बाहेरच्यांकडेही जिल्ह्याचे पालकत्व

बीड जिल्ह्याचे पालकत्व इतर जिल्ह्यातील मंत्र्यांनीही केलेले आहे. बाबासाहेब भोसले, शंकरराव कोल्हे, बबनराव पाचपुते, अतुल सावे अशी अनेक नावे बाहेरची आहेत. त्यात आला अजित पवार यांच्या नावाचा समावेश झाला आहे.

### एकाच वेळी दोन कॅबिनेट मंत्री कधी होते?




२००४ साली विमलताई मुंदडा आणि जयदत्त क्षीरसागर हे एकाचवेळी कॅबिनेट मंत्री होते; पण त्यांचा कार्यकाळ खूप कमी होते. त्यावेळी मुंदडा या पालकमंत्री होत्या.
**त्यानंतर २०१४ ते २०१२ या कालावधीत पंकजा मुंडे या पालकमंत्री होत्या. शेवटच्या काही महिन्यांमध्ये जयदत्त क्षीरसागर हे राष्ट्रवादीतून शिवसेनेत गेले. त्यावेळी त्यांनाही कॅबिनेट मंत्री केले होते.**
आता धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे कॅबिनेट मंत्री आहेत. एकाचवेळी दोन कॅबिनेट मंत्री असण्याची ही तिसरी वेळ आहे.



# एकनाथ शिंदेंची गरज संपली, त्यांना संपवून नवा 'उदय' पुढे येणार

मुंबई , (दिव्य न्युज):-महायुती सरकारमध्ये सध्या पालकमंत्री पदावरूनही प्रचंड नाराजी असल्याचे पाहायला मिळत आहे. शनिवारी महायुती सरकारने पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी दोन पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली. त्यामुळे महायुतीमध्ये पालकमंत्रीपदावरुन वादाची ठिणगी पडल्याचे म्हटलं जात आहे. अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज होऊन दरे गावी गेल्याचे म्हटलं जात आहे. अशातच विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी खळबळजनक दावा केला आहे. एकनाथ शिंदे यांची गरज संपली असून नवीन उदय पुढे येणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं.

पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाल्यानंतर नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्र्यांच्या नावाला स्थगिती देण्यात आली. रायगडच्या पालकमंत्री पदावर शिंदे गटाने दावा केला होता. तर नाशिकच्या पालकमंत्रीपदी गिरीष महाजन यांच्या नावाला अजित पवार गटाने विरोध केला होता. त्यानंतर

## वडेट्टीवारांचा मोठा दावा

रविवारी महायुती सरकारमधील मंत्री आदिती तटकरे आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या नावाला स्थगिती देण्यात आली. दादा भुसे आणि भरत गोगावले यांना पालकमंत्री पद न मिळाल्याने एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा सुरु झाली आहे. यावरुनच विजय वडेट्टीवार यांनी टोला लगावला आहे.

ही सगळी परिस्थिती पाहून जनताच सरकारला स्थिगिती देईल असं मला वाटायला लागलय. बहुमत मिळालं तरी ही काय सरकार चालवायची पद्धत आहे. आपआपसातले मतभेद वाढले आहेत. केवळ सत्तेसाठी ही स्पर्धा सुरु आहे. भांडा आणि महाराष्ट्राचे वाटोळे करा असं म्हणायची वेळ आली आहे. आता पालकमंत्री बदलले आहेत शेवटी मुख्यमंत्री बदलायची पाळी येईल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

यावेळी एकनाथ शिंदे नाराज होऊन दरे गावी गेल्याचे पत्रकारांनी विचारले. त्यावरही वडेट्टीवारांनी भाष्य केलं. नाराज होऊन पदरात पाडता येईल असा विषय आता फक्त बाकी आहे. एकनाथ शिंदेंची परिस्थिती बिकट आहे. एकनाथ शिंदेंची गरज संपली का? कदाचित एकनाथ शिंदेंना संपवून एक नवीन उदय पुढे येईल. शिवसेनेच्या बाबतीत ही सुद्धा स्थिती येईल. शिवसेनेचा तिसरा उदय दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण उदय दोन्ही बाजूवर हात ठेवून आहेत. त्यांनी संबंध इतके सुंदर करून ठेवले आहेत की ते उदयासाठीच आहेत, असा टोलाही विजय वडेट्टीवारांनी लगावला.

# वाल्मीक कराडच्या जामिनावरील सुनावणी पुन्हा लांबली

## खंडणी प्रकरणात कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा वकिलाचा दावा

बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडच्या जामिनावरी सुनावणी कोर्टाने आज पुन्हा एकदा लांबणीवर टाकली. आज केज कोर्टापुढे ही सुनावणी होणार होती, पण कोर्टाने ऐनवेळी ती लांबणीवर टाकली. यामुळे जामिनाच्या प्रयत्नांत असणाऱ्या वाल्मीक कराडला जोरदार झटका बसला आहे. दरम्यान, बचाव पक्षाच्या वकिलांनी खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला आहे.

वाल्मीक कराडचे वकील अशोक कवडे कोर्टाच्या सुनावणीपूर्वी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने खंडणी मागितल्याचा किंवा त्यांना खंडणी देण्यात आल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. पण माध्यमांच्या दबावामुळे नाहक त्यांना या प्रकरणी गोवण्यात आले आहे.

वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात १४ जानेवारी रोजी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर आम्ही तत्काळ जामिनासाठी याचिका दाखल केली. त्यावर कोर्टाने सरकारी पक्ष व तपासी अधिकाऱ्यांचे उत्तर मागितले. सरकारी पक्षाने आपले उत्तर दाखल केले आहे. या प्रकरणी १८ जानेवारी रोजी सुनावणी होणार होती. मात्र माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे ही सुनावणी आज सोमवारी होणार होती.

हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालणार आहे. या प्रकरणी न्यायालयात जोरदार युक्तिवाद होईल. न्यायालय आमची बाजू ऐकून घेईल. या दोन - तीन बाबी विचारात घेऊन आम्हाला जामीन मिळेल असा अंदाज आहे. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास आहे. त्यांच्यावरील १४ गुन्ह्यांपैकी ११ ते १२ गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. एक ते दोन गुन्हे राजकीय आंदोलनाच्या संदर्भात परळी न्यायालयात प्रलंबित आहेत. ही यादी वाल्मीक कराड यांनी स्वतःहून दाखल केली आहे, असेही वकील अशोक कवडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

बचाव पक्षाच्या वकिलांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांड व खंडणीच्या गुन्ह्याचा वाल्मीक कराडशी संबंध आहे किंवा नाही याचा खुलासा तपास अधिकारी करतील असेही सांगितले. संतोष देशमुख हत्या व खंडणीच्या गुन्ह्याशी वाल्मिक कराड यांचे कनेक्शन आहे की नाही? या गुन्ह्यासंदर्भात त्यांच्याकडे तसे पुरावे आहेत का नाही? हे तपासी अधिकारी कोर्टसमोर स्पष्ट करतील, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाल्मीक कराडने खंडणी प्रकरणात गत ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता त्याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे त्याला जामीन मिळणे अवघड असल्याचे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्ष न्यायालयात काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# आधी मारला गावरान चिकन हंडीवर ताव, मग शिजला सरपंचाच्या हत्येचा कट

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावच्या सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येला जवळपास दीड महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तसेच सीआयडी देखील या प्रकरणाचा तपास करत आहे. या प्रकरणात दररोज नवे खुलासे होत आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक अपडेट समोर आली आहे.संतोष देशमुखांच्या हत्येचा कट हा एका हॉटेलमध्ये बसून रचल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यभर गाजत असलेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचां कट सुदर्शन घुले आणि त्याच्या टोळीने एका हॉटेल मध्ये बसून रचला. यावेळी गावरान चिकनची ऑर्डर दिली होती. तर पाच ते सहा जण जेवायला होते असं हॉटेल मालकांनी सांगितलं..ज्या हॉटेलमध्ये बसून हत्येचा रचला. ते हॉटेल केज - मांजरसुंबा राष्ट्रीय महामार्गावरील नांदूर फाटा येथील तिरंगा हॉटेलमध्ये हत्येचा कट रचण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

तपास अधिकाऱ्यांनी सीसीटीव्ही ताब्यात घेतले

हॉटेलचे मालक म्हणाले, ८ डिसेंबरला आरोपी आले होते. दोन गावरान चिकन हंडी ऑर्डर केली आणि जेवण करून ते गेले. सहा ते सात जण होते.अर्धा ते पाऊण तास ते हॉटेलमध्ये थांबले होते. आम्ही तपास अधिकाऱ्यांना हॉटेलचे सीसीटीव्ही देखील दिले आहे.

२५ जानेवारीला मुंबईत जनआक्रोश मोर्चाची हाक

बीड प्रकरणाचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटत आहे. संतोष देशमुखांना न्याय मिळून देण्यासाठी संपूर्ण देशमुख कुटुंब रस्त्यावर उतरले आहे. आज अकोल्यात मोर्चा आहे. या मोर्चात सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख , भाऊ धनंजय देशमुख आहे. तसेच २५ जानेवारीला मुंबईत जनआक्रोश मोर्चाची हाक देण्यात आली आहे. राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांकडून देण्यात हाक आली आहे. मुंबईतील मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान यामार्गावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चात सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटना मोर्चात सहभागी होणार आहेत.

# केज नगरपंचायतला मिळणार नगरपरिषदेचा दर्जा मिळणार

## आमदार नमिता मुंदडांनी विधानसभेत केली होती मागणी

केज (दिव्य न्युज):- केज शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या विचारात घेऊन ग्रामपंचायतचे नगरपंचायतमध्ये रूपांतर झाले. आता लवकरच केज नगरपंचायतला दर्जावाढ मिळून नगर परिषद अस्तित्वात येणार असल्याची माहिती आमदार नमिता मुंदडा यांनी दिली आहे.

वाढत्या केज शहराला विकास निधीची कमतरता भासत असल्याने यापूर्वी ग्रामपंचायतचे नगरपंचायतमध्ये रूपांतर करण्यात आले. तरीही शहराचा झालेला भौगोलिक विस्तार व वाढती लोकसंख्या यामुळे नागरिकांची मुलभूत सोयी-सुविधांसाठी परवडच होत आहे. शहराच्या आजुअब्जुल मोठा ग्रामीण भाग असल्याने केज येथे मोठी बाजारपेठ देखील आहे. त्यामुळे वाढत्या शहराच्या सर्वांगीण आणि मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी केज नगर पंचायतला नगरपरिषदेचा दर्जा देण्याचा प्रस्ताव आमदार नमिता मुंदडा यांनी शासनाकडे दिला होता. त्यासाठी विधीमंडळाच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न व लक्षवेधी उपस्थित करून याकडे शासनाचे लक्ष वेधले होते. आ. मुंदडा यांच्या पत्रव्यवहार व पाठपुराव्याला यश येऊन केज नगरपरिषद आस्तित्वात येणार असल्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू झाल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून यासंबंधी जाहीर प्रगटन व नाहरकती मागवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यासंबधी अधिसूचना काढण्यात येऊन केज नगरपंचायतचे नगरपरिषदेत रूपांतर होणार असल्याची माहिती आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी दिली आहे.

पान १ वरून

## बीडचे आ.संदीप क्षीरसागर

यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी नागरीकांनी देखील आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे शहरातील समस्या मांडल्या. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी नगर पालिकेच्या उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सुचना देखील यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिल्या. नगरपालिकेतील पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग, बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, अभिलेख विभाग, कर विभाग, लेखा परीक्षण विभाग, विद्युत विभाग, संगणक विभाग आदींसह नगररचना विभागाचा आढावाही आ.क्षीरसागर यांनी घेतला. यासोबतच गेल्या काही वर्षांपासून शहरातील मालमत्तांचा रिव्हीजन सर्व्हे झालेला नाही. हा सर्व्हे दर चार वर्षांनी केल्यास उत्पन्न वाढवता येईल. बीओटी तत्वावरील काही इमारती धुळखात पडलेल्या आहेत. त्या वापरात आणून त्यातूनही उत्पन्न वाढविता येऊ शकते. अशा उपाययोजना यावेळी सुचविण्यात आल्या. बीड शहरात एकाही ठिकाणी नगर पालिकेची पार्किंग नाही,त्यामुळे काही जागा ज्या पडीक आहेत, किंवा वापरात नाहीत अशा ठिकाणी व्यवसायीक गाळे आणि पार्किंगची सुविधा उपलब्ध केल्यास त्यातूनही उत्पन्न वाढवता येईल अशा देखील सुचना यावेळी करण्यात आल्या. नाविण्यपुर्ण योजनेतून नगर पालिकेला निधी मिळावा त्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याच्या सुचना आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांनी दिल्या. शहरात ठिकठिकाणी लोखंडी कचरा कुंड्या ठेवण्यात आलेल्या आहेत. मात्र त्या जाग्यावरच सडून चालल्या आहेत. त्याच्या खरेदीच्या अनुषंगानेही कार्यवाही करावी, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज हे मुलभूत प्रश्न तात्काळ मार्गी लावा त्यात हयगय करू नका लोकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडवा अशा सक्त सुचना आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिल्या.

आता प्रत्येक महिन्याला आढावा !

बीड शहरातील मुलभुत प्रश्नांच्या अनुशंगाने आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना केल्या आहेत. त्याचबरोबर आता प्रत्येक महिन्याला झालेल्या कामांचा आढावा घेणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगीतले.

## धनंजय मुंडे यांनी

तृप्ती देसाई यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात परळीत येऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना ताकीद द्यावी. मी अजून फार काही बोलले नाही. पण सातत्याने खालच्या पातळीवर ट्रोलिंग करण्यात आली, तर मी परळीत येऊन बसेन व लोकशाही मार्गाने त्यांना धडा शिकवेन, असे तृप्ती देसाई यांनी या प्रकरणी म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे तृप्ती देसाई यांनी दोन दिवसांपूर्वीच वाल्मीक कराडने फरार असताना १५ व १६ डिसेंबर रोजी दिंडोरी येथील एका स्वामी समर्थ केंद्रात वास्तव्य केल्याचा आरोप केला होता. वाल्मीक कराड व विष्णू चाटे १५ व १६ डिसेंबर रोजी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथील एका आश्रमात मुक्कामाला होते. त्यावेळी खंडणी प्रकरणात पोलिस त्यांचा शोध घेत होते. ते तिथे दोन दिवस राहिले. त्यानंतर १७ डिसेंबर रोजी पुढच्या प्रवासाला निघून गेले.

या आश्रमात मागच्या वर्षी काही चुकीचे प्रकार घडले होते. त्याविषयी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृहावर एक बैठक बोलावली होती. या बैठकीला अण्णासाहेब यांचे सुपुत्र चंद्रकांत मोरे उपस्थित होते. त्यावेळी वाल्मीक कराडने मध्यस्थी केली होती. त्याचे हे उपकार फेडण्यासाठी त्याला या आश्रमात आता आश्रय दिला असावा, असा आरोप तृप्ती देसाई यांनी केला होता.विशेषतः धनंजय मुंडे यांचे थेट वाल्मीक कराडशी संबंध असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांना पाठिशी घालत असल्याचा आरोपही त्यांना केला होता. त्यानंतर आता पुन्हा त्यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात मोर्चा उघडल्यामुळे त्यांच्या पुढील पाऊलाकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

## पाणी तपासणीसाठी

असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सचिव स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई, उपसंचालक आरोग्य सेवा राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांना केली आहे.

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पाठिमागील बाजूस असलेल्या पाणीतपासणी प्रयोगशाळेत चक्क देशीदारूच्या रिकाम्या बाटल्या पाण्याचे नमुणे ठेवल्याचे दिसून आले. सदरील बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करून प्रयोगशाळा प्रशासन वापरात घेत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला असून त्या बाटल्याच्या झाकणावर टँगो, बॉबी, संत्रा लिहिलेले लेबल तरी काढून प्रयोगशाळा प्रशासनाने अशा बाटल्यांचा वापर करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. पाणी तपासणी प्रयोगशाळेतून जिल्ह्याच्या आरोग्याचा प्रश्न अवलंबून असतो. पाणी योग्य आहे की अयोग्य आहे या अहवालावर बीडचे नागरिक व ग्रामस्थ पाण्याचा वापर करतात. जर अशाप्रकारे दारूच्या बाटल्यात पाणी नमुणे तपासणी होत असेल तर ही बाब गंभीर आहे. प्रयोगशाळा प्रशासन या दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करत असतील का? असाही प्रश्न सर्वसामान्यांना पडला असून दारूचे लेबल पाहून पाण्याच्या तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याची जिल्हाधिकार्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

प्राथमिक आरोग्यकेंद्र, खासगी शाळा, तसेच शहरातील हॉटेल व इतर सार्वजनिक ठिकाणी वापरात असलेले पाणीनमुणे या प्रयोगशाळेत तपासणीसाठी येतात. पाणीतपासणीवर प्रयोगशाळा प्रशासन लाखो रुपये खर्च करत असावे तसेच या पाणीनमुणे तपासणीवर लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्या दृष्टीकोनातून उपसंचालक पुणे यांनी पाणी तपासणीसाठी काचेच्या बाटल्या उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. परंतु प्रयोगशाळा प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करताना दिसत असून अशाप्रकारे देशीदारूच्या रिकाम्या बाटल्यात पाणीनमुणे तपासणीसाठी घेणे योग्य आहे का? याचा प्रयोगशाळा प्रशासनाने विचार करण्याची गरज आहे.

## शासनाची फसवणूक

अर्चक नेमणूक करून वक्फ मंडळाची दिशाभूल व फसवणूक केलेली आहे या मधील काही गैरअर्जदार हे समनापूर ता बीडची दर्गा दावल मलीक संबंधी बेकायदेशिरपणे बनावट कागदपत्र आधारे क दर्जा मिळविला होता तो शासनानी रद्द केलेला असून यामध्ये भलतेच बनावटी कागदपत्रे लावण्यात आले होते . या प्रकरणांत वक्फ मंडळाने नियुक्त केलेले मुतवली मयत असतांना मयत झाल्यानंतर १ वर्षानंतर मुतवली नियुक्त केले आहे. व मा कोर्टाने अर्ज नं . ६०१/२०१६ दि .०.०२.२०१६ वारस प्रमाणपत्र दिला असून याची चौकशी करण्यात यावी . तरी मे सोबांना विनंती की , वक्फ संस्था दर्गा ख्वाजा बंदेनवाज मौजे कुमशी ता बीड ची नोंद गॅझेट मध्ये आहे या वक्फ दर्गाला ग न १६० आहे , याला ८ एकर २० गुंठे जमिन शेतीसाठी आहे . यामध्ये सुरू असलेली व दाखल केलेल विरासत ना मंजूर करून विरासत मध्ये संगनमताने बनावटी कागदपत्रे तयार करून दाखल केलेली व्यक्ती विरासत ची चौकशी करून विरासत ना मंजूर करण्यात यावे , शासनाची फसवणूक करणारे अर्जदार व गैरअर्जदार व इतर यांचे विरोधात कायदेशीर दंडात्मक कार्यावाही करावी अशी मागणी ईलियास बेग अलताज बेग यांच्या वतीने करण्यात आली आहे..

## एसटी निविदेत

काढल्यास किंमतवाढ होईल असा दावा करण्यात आला होता. मात्र महामंडळातील काही अधिकाऱ्यांनी समुह निविदेच्या प्रस्तावास विरोध करीत हा प्रस्ताव पुन्हा संचालक मंडळासमोर मांडण्याची भूमिका घेतली. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांचीच अन्यत्र बदली करण्यात आली आणि तेथे मर्जीतील अधिकाऱ्यांना बसवून ही निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्याची बाब समोर आली होती.

महामंडळाच्या या घोटाळ्यामुळे मे. अँथोनी रोड ट्रान्सपोर्ट सोलूशन प्रा. लि., मे. सिटी लाइफलाइन ट्रॅव्हल्स प्रा.लि. आणि मे. ट्रॅव्हल टाइम प्रा. लि. या तीन कंपन्यांनाच लघुत्तम निविदाकार म्हणून प्रत्येकी एक याप्रमाणे तिघांना तीन समूहातील कंत्राटे मिळाली आणि गाड्या पुरवण्याचे इरादापत्रही देण्यात आले होते. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे परिवहन विभागाचा कार्यभार असताना त्यांनाही अंधारात ठेवून ठेकेदारांना दरवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची आणि एकूणच या निविदा प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली होती. फडणवीस यांनी या निविदा प्रक्रियेला स्थगिती देत परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी यांच्या मार्फत चौकशीचे आदेश दिले होते. सेठी यांनी या घोटाळ्याचा चौकशी अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर केला असून त्यात निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा निष्कर्ष काढत ही निविदा प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस समितीने केल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. त्याप्रमाणे या प्रकरणात महामंडळातील काही अधिकाऱ्यांवरही समितीने ठपका ठेवल्याचे सांगितले जाते.

## मुख्य ध्वजारोहण

करण्यात येऊ नये, असे राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे. मुंबई येथील मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क दादर मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वकसंचलन कार्यक्रम होईल, त्यानुसार बीडचे मुख्य शासकिय ध्वजारोहन क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते तर जालन्याचे मुख्य शासनाताईच्य हस्ते गोणार आहे. राष्ट्रध्वजारोहण करणारे मंत्री अथवा राज्यमंत्री काही अप वरणामुळे कर्यक्रम स्थळी उपस्थित राहू शकल्यास विभागीय मुख्यालय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्य जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व व्यजारोहण करतील संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार है अनुक्रमे जिल्हा उपविभागीय मुख्यालयी ध्वजारोहण कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.